दूरध्वनी क्र. ०७१२-२५५६७७३
Email ID:
apccfhrmadmn@gmail.com

महाराष्ट्र शासन
वन विभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४०००१

---

**ई-मेलव्दारे**

क्रमांक : कक्ष-१०(२)/एक/प्र.क्रं.५८/(२१-२२)/३५९ नागपूर ४४०००१, दिनांक:०५/०१/२०२२

प्रति,
प्रधान सचिव (वने),
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय:- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्याकडून वसूली न करणेकामी आदेश निर्गमित होणेबाबत

संदर्भ:- १) मा. सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हिल अपील क्र. ११५२७/२०१४ मध्ये दिनांक १८/१२/२०१४ रोजी झालेले आदेश
२) विशेष पोलिस महानिरीक्षक (आस्थापणा), पोलिस महासंचालक, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. पोमस/६/अतिप्रदान वसूली/११०/२०१७, दिनांक ५/९/२०१८

महाराष्ट्र वनरक्षक-वनपाल संघटना यांचे प्रतिनिधी यांनी "मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्याकडून वसूली करू नये" अशी विनंती दिनांक २०/५/२०२० व दिनांक २१/१२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत केली आहे.

२) मा. सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हिल अपील क्र. ११५२७/२०१४ मध्ये पंजाब शासन व इतर विरूध्द श्री रफिक मसिह (व्हाइट वाशर) यांचे प्रकरणी दिनांक १८/१२/२०१४ रोजी आदेश निर्गमित झाले असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील परीच्छेद १२ (i ते v) नुसार खालीलप्रमाणे दिलेल्या काही परिस्थितीमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्याकडून वसूली करू नये असे निर्देशित केले आहे.

*१२. It is not possible to postulate all situations of hardship, which would govern employees on the issue of recovery, where payments have mistakenly been by the employer, in excess of their entitlement. Be that as it may, based on the decisions reffered to herein above, we may, as a ready*

2



Scanned by CamScanner

*reference, summarise the following few situations, wherein recoveries by the employers, would be impermissible in law :*

*(i) Recovery from employees belonging to Class-III and Class-IV service (or Group 'C' and Group 'D' service)*

*(ii) Recovery from retired employees, or employees who are due to retire within one year, of the order of recovery.*

*(iii) Recovery from employees, when the excess payment has been made for a period in excess of five years, before the order of recovery is issued.*

*(iv) Recovery in cases where an employee has wrongfully been required to discharge duties of a higher post, and has been paid accordingly, even though he should have rightfully been required to work against an inferior post.*

*(v) In any other cases, where the Court arrives at the conclusion, that recovery if made from the employees, would be iniquitous or harsh or arbitrary to such an extent, as would far outweigh the equitable balance of the employer's right to recover.*

३) विशेष पोलिस महानिरीक्षक (आस्थापणा), पोलिस महासंचालक, मुंबई यांनी दिनांक ५/९/२०१८ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील परीच्छेद १२ (i ते v) नुसार कार्यवाही करणेबाबत त्यांचे अधिनस्त कार्यालयांना सूचित केले आहे. 59/c

४) विधी व न्याय विभाग यांचे कडील परिपत्रक दिनांक २८/२/२०१७ अन्वये न्यायालयाने दिलेल्या प्रकरणांनुसार प्रशासकीय प्रकरणात सर्व विभागांनी निर्णय घ्यावेत असे स्पष्ट निर्देश मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी सदर परिपत्रकात दिले आहेत. याबाबत ग्राम विकास व जलसंधारण विभाग मुंबई यांनी आपले अधिनस्त सर्व विभागीय आयुक्त व सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा यांना दिनांक १/८/२०१७ चे पत्रान्वये सूचित केले आहे. 29/c 35/c

५) मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार वन विभागाव्दारे अशा प्रकारची कार्यवाही होणे अपेक्षित असल्यामुळे तसेच प्रशासकीय प्रकरणात कर्मचाऱ्याकडून दाखल होणारे मुळ अर्ज व याचिकांचा विचार करता या कार्यालयातील विधी सल्लागार यांचे अभिमत घेण्यात आले. त्यानुसार विधी सल्लागार यांनी खालीलप्रमाणे अभिमत दिले आहे.

> *"मा. सर्वोच्च न्यायालयाने वर्ग-३ व ४ च्या कर्मचाऱ्याकडून वसूली करू नये असे आदेश दिले आहेत हे खरे आहे व अशी जवळपास १५-२० प्रकरणे आपले कडे आलेली आहेत. त्यापैकि काही प्रकरणात आपल्या बाजूने देखील निकाल दिलेला आहे हे ही सत्य आहे. प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार मा. न्यायालयाने निकाल दिलेले आहेत. परंतु Recovery करावयाची नसल्यास शासनाचे प्रशासकीय आदेश/शासन निर्णय निर्गमित होणे आवश्यक आहे."* 1/N

Scanned by CamScanner

तरी प्रस्तुत प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश तसेच विविध विभागाने या संदर्भात केलेली कार्यवाही विचारात घेता वन विभागातील वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी यांचे कडून वसूली करू नये याबाबत शासन स्तरावरून त्वरेने आदेश निर्गमित होणेस विनंती आहे. जेणेकरून याकामी उद्‌भवणारे न्यायिक प्रकरणास आळा घालणे सोयीचे होईल.

सहपत्र:- संदर्भ क्र. १ व २

(विकास गुप्ता)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन दुय्यम संवर्ग)

प्रतिलिपी:- मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व यांना माहितीस्तव

Scanned by CamScanner